## आदेश
## (नि.क्र.६६ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणाी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दाव्यातदुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा गट क्र. २३५/१ ते २३५/३ या जमिनीमध्ये प्रतिवादींच्या तथाकथित असलेल्या ०.७९ आर क्षेत्रावरील अतिक्रमण काढून ताबा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी हजर होऊन कैफियत दिली आहे. दाव्यामध्ये वादी यांच्या बाजुने पुरावा संपलेला आहे व प्रतिवादी क्र. ८ ने त्याचे सरतपासणीचे शपथपत्र दाखल करुन त्याच्या उलटतपासासाठी दावा प्रलंबित आहे. दावा दि. १९/११/२०१४ रोजी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी दावा कलम १क मधील मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास प्रतिवादी जालिंदर दादासाहेब धुमाळ, सुभाष दादासाहेब धुमाळ व नाथा कुंडलिक धुमाळ यांची नावे गट क्र. २३९ या मिळकतीस असल्यामुळे त्यांना प्रतिवादीपणात प्रतिवादी केले होते. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरच्या दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी यांनी कर्जत येथील न्यायालयात रेमुनं. ३२/२०१९ दाखल करुन त्यामध्ये आपसात तडजोड केली व दावा कलम १ क मधील गट क्र. २३९ पैकी ० हे. ४२ आर मिळकत महेंद्र जालिंदर धुमाळ यांच्या नावे केलेली आहे. वादी यांनी दि. २०/०९/२०२५ रोजी गट क्र. २३९ चा ७/१२ उतारा व फेरफार क्र. ३१६८ चा उतारा काढल्यानंतर वादीला ही बाब लक्षात आली. त्यामुळे सदर महेंद्र जालिंदर धुमाळ यांना या दाव्यात प्रतिवादी क्र. ९ करण्यात यावे व तशी दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली. वादीने पुढे असे कथन केले आहे की, अर्जात नमुद परिच्छेद क्र. ४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सदर प्रतिवादी क. ९ यांच्यासंदर्भातील मजकुर दाव्यात परिच्छेद क्र. ३अ करुन लिहिण्याची परवानगी देखील मागितलेली आहे. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल

स्वरुपाची असून दाव्याच्या स्वरुपात त्यामुळे कोणताही बदल होणार नाही व सदर प्रतिवादी क्र. ९ यांची उपस्थिती दाव्याच्या सुनावणीसाठी गरजेची आहे. वादीने विनंती केली आहे की, अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. प्रतिवादी यांनी नि.क्र.७० वर सदर अर्जास आक्षेप घेऊन असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज मेंटेनेबल नाही. वादीचा पुरावा संपलेला आहे व प्रतिवादी क्र. ८ चा पुरावा सुरु आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे संपरिक्षा सुरु होण्यापुर्वी वादपत्रात दुरुस्ती करता येते. संपरिक्षा सुरु झाल्यानंत वादपत्रात दुरुस्ती करता येणार नाही. सदरचा दावा ११ वर्षे जुना आहे. दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. वादीने प्रकरणाचा विलंब करण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादीचा दावा मुळात मेंटेनेबल नाही. प्रतिवादीने अतिक्रमण केले नाही. सन १९४४ पासुन प्रतिवादीच्या मालकी हक्काने प्रतिवादीची मिळकत ताब्यात आहे. महेंद्र जालिंदर धुमाळ हे गट क्र. २३९ पैकी ० हे. ४२ आरचे मालक आहेत व त्यांनी अतिक्रमण करण्याचा प्रश्न उध्भवत नाही. रेमुनं. ३२/२०१९ मधील तडजोडी वर आतापर्यंत कोठेही तक्रार केली नाही असे कथन करुन वादीचा सदरच अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, वादीने वादपत्रात जालिंदर दादासाहेब धुमाळ यांना प्रतिवादी क्र. ६ केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४ नाथा कुंडलिक धुमाळ व प्रतिवादी क्र. ५ सुभाष दादासाहेब धुमाळ यांना प्रतिवादी केलेले आहे. वादपत्राचे परिच्छेद क्र. १ क मध्ये गट क्र. २३९ ची मिळकतीचे वर्णन केलेले आहे व सदरची मिळकत ही प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्या नावे असल्याबद्दल वादपत्रात मजकुर नमुद केलेला आहे. प्रतिवादी यांनी मान्य केले आहे की, रेमुनं. ३२/२०१९ मधील आदेशान्वये गट क्र. २३९ पैकी ० हे. ४२ आर मिळकतीवर मालक म्हणुन महेंद्र जालिंदर धुमाळ यांचे नाव लागलेले आहे. वादीने त्याच्या वादपत्रात असे देखील नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ३, ७ व ८ यांनी वादीच्या पश्चिम बाजुस पश्चिम-दक्षिण कोपऱ्याकडील मिळकतीवर अतिक्रमण करुन घरे बांधली आहेत व प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी शेतजमिन वहीत करण्यास सुरुवात केली आहे. प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांनी मका, ज्वारीचे पीक केलेले आहे. वादीने वादपत्रात पुढे असे कथन

केले आहे की, ० हे ७९ आर मिळकतीवर प्रतिवादी बेकायदेशीर ताब्यात आहेत. वादीचे वादपत्रातील कथन व प्रतिवादी यांनी मान्य केलेली तथ्ये यावरुन प्रथम दर्शनी असे दिसून येत आहे की, प्रतिवादी क्र. ६ यांचा मुलगा महेंद्र जालिंदर धुमाळ यांच्या नावे गट क्र. २३९ मधील मिळकत प्रतिवादी क्र. ६ ने केलेली आहे. गट क्र. २३९ हा वादीने वादपत्रामध्ये वादमिळकत म्हणुन घेतलेला आहे. त्यामुळे व नियोजीत प्रतिवादी हा या दाव्यातील प्रतिवादी क्र. ६ चा मुलगा असल्याने सदर नियोजीत प्रतिवादी क्र. ९ महेंद्र जालिंदर धुमाळ यांची उपस्थिती दाव्याच्या संपरिक्षेदरम्यान आवश्यक वाटते. त्यामुळे सदर नियोजीत प्रतिवादी क्र. ९ यांना दाव्यात प्रतिवादी क्र. ९ म्हणुन सामाविष्ट करणे गरजेचे व आवश्यक आहे. तसेच त्यानुशंगाने वादीने त्याच्या अर्जात नमुद केलेली परिच्छेद क्र. ४ मध्ये दुरुस्ती देखील वादपत्रात करणे गरजेचे आहे. प्रतिवादीतर्फे विधिज्ञांनी आक्षेप घेतला आहे की, दावा प्रतिवादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे व या स्थितीला वादीला दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देता येणार नाही. परंतु वादीने असे कथन केले आहे की, नियोजीत प्रतिवादी क्र. ९ याच्या नावे गट क्र. २३९ मधील मिळकत आल्याबद्दल त्यांना दि. २०/०९/२०२५ रोजी माहिती झाली आहे. त्यामुळे माहिती झाल्यापासून वादीने दि. ०४/१०/२०२५ रोजी अर्ज दिला आहे. यावरुन वादीची तत्परता दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेला आक्षेप मान्य करता येणार नाही. वरीलप्रमाणे चर्चा केल्याप्रमाणे नियोजीत प्रतिवादी क्र. ९ ची दाव्यात संपरिक्षेदरम्यान आवश्यकता असल्याने वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी प्रतिवादी क्र. ९ म्हणुन महेंद्र जालिंदर धुमाळ यांना वादपत्रात सामिल करावे. अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देण्यात येत आहे व त्याबद्यलची दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.11.19 17:44:50 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :१९/११/२०२५.